**रे.के.नं.५८/२०१९ मध्ये आरोपी स्वप्नील नेवरेकर आणि प्रशांत पेडणेकर यांचे जामीन अर्जावरील एकत्रित आदेश**

०१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी यांनी जामीन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. त्यांच्या अर्जातील कथनानुसार आरोपी यांनी कोणतेही गुन्हयाचे कृत्य केलेले नाही व त्यांना संशयावरुन नाहकपणे या प्रकरणामध्ये गोवण्यात आले. आरोपी हे योग्य व लायक जामीन देण्यास तयार आहेत. ते मौजे वाळवटी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील कायमचे रहिवासी आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांना जामीनावर खुले केल्यास ते कोठेही पळून जाणार नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, ते फिर्यादी किंवा साक्षीदार यांना प्रभावित करणार नाही. त्यांनी असेही कथन केले आहे की, या न्यायालया व्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयात जामीनाचा अर्ज दाखल केलेला नाही. सदर प्रकरणातील तपास पुर्ण झाला असल्याने त्यांना कोठडीमध्ये ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे देखील त्यांनी नमुद केले आहे.

०३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. यातील आरोपी याने फिर्यादी यांना जमिनीतून सोने काढून देतो असे सांगून त्याचेकडून रुपये सतरा लाख सत्त्याहत्तर हजार एवढी रक्कम लुबाडलेली आहे. इतर आरोपी अदयाप फरार आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर आरोपी जामीनावर सुटल्यास तो पळून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्य

आरोपींचा शोध लागणे अशक्य होईल. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांनी अशाच प्रकारचा गुन्हा चिपळूण येथे केलेला आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व लेखी म्हणणे वाचले. सरकारी वकील व आरोपीतर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे वकील यांच्या युक्तीवादात त्यांनी प्रामुख्याने असे नमुद केले की, फरार आरोपी संदीप गोसावी यांनी रकमेची पुर्ण जबाबदारी स्विकारल्याबाबतची दिनांक २७/०२/२०१९ रोजीचे प्रतिज्ञापत्र या प्रकरणी दोषारोप पत्रात दाखल आहे. त्यामुळे आरोपी यांच्याकडे कोणत्याही रकमेची जप्ती होण्याची शक्यता नाही. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाची भिस्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या खेमलो सावंत वि. सरकार २००१ बीसीआर क्रिमी. या न्यायनिर्णयावर ठेवली आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, आरोपी यांनी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील रहिवासी असून ते पळून जाण्याची शक्यता नाही. त्यांनी bail is rule and jail is exception या तत्वाचा आधार युक्तीवादात घेतलेला आहे.

०५. प्रस्तुत प्रकरणाचा तपास पुर्ण होवून दोषारोप पत्र दाखल झाले आहे. या प्रकरणामध्ये आरोपी यांना कोठडीमध्ये ठेवण्यासाठी अन्य कोणतेही कारण उरलेले नाही. सरकारी वकील यांनी व्यक्त केलेली फिर्यादी व साक्षीदार यांचेवर येवू शकणा—या दबावाची शक्यता जामीन नाकारण्यास पुरेशी नाही. यातील आरोपी हे न्यायालयाचे अधिकार क्षेत्रात राहण्यास असलेने त्यांना जामीन दिल्यास ते पळून जाण्याची शक्यता वाटत नाही. इतर आरोपी फरार असल्याबाबत सरकारी वकील यांनी उपस्थित केलेल्या युक्तीवादाकरीता प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेल्या मा.

उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णयातील परिच्छेद क्र.१० मधील न्यायालयाचे निरीक्षण या प्रकरणामध्ये लागू होतात.त्यामुळे आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर करणेस कोणतेही कारण उरत नाही. सबब, आरोपींचा जामीन अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी स्वप्नील नेवरेकर आणि प्रशांत पेडणेकर यांनी प्रत्येकी रुपये १५,०००/— इतक्या रकमेचा वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र दयावे.

०२. आरोपी यांनी साक्षीदार यांचेवर दबाव टाकू नये.

०३. आरोपी यांनी त्यांच्या अर्जातील नमुद अटी व शर्तींचे पालन करावे.

०४. आरोपी यांनी त्यांच्या रहिवासाच्या पत्त्याबाबतचा पुरावा म्हणून आधारकार्ड व रेशनकार्डच्या सत्यप्रती दाखल कराव्यात.

श्रीवर्धन.                                   ( प्र. ग. लंबे )
दिनांक : ०४/११/२०१९.          प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.